समता न्याय एकात्मता

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, पुणे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसोर,येरवडा, पुणे-०६.

दुरध्वनी क्रमांक: ०२०-२९७०६६११ E-mail : acswopune@gmail.com

दिनांक:-२२/०५.२०२३

क्र.सआसकपुणे/शिष्यवृत्ती/२०२२-२३/पुणे/२८४०

प्रति,

प्राचार्य

पुणे जिल्हयामधील सर्व महाविदयालये.

**विषय- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे सॉफटवेअर तयार करण्यासाठी माहिती सादर करणेबाबत.**

संदर्भ-१.सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२०१६/ प्रक्र.२९३/शिक्षण-२ दिनांक ६ जानेवारी २०१७.

२.सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२०१६/ प्रक्र.२९३/शिक्षण-२ दिनांक १३ जून २०१८.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयानुसार इयत्ता १० वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसुचित जाती व नवबौध्द विदयार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी शासनाने सन २०१६-१७ पासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यांचा निर्णय घेतलेला आहे. सदर योजना ही विभागाची महत्त्वपूर्ण व यशस्वी योजना असून या योजनेमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने विभागाने सॉफटवेअर विकसित केलेले आहे. जेणेकरून सदर योजनेचा लाभ सन २०२३-२४ पासून घेता येईल.

संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयामध्ये सदर योजनेच्या अटी व शर्ती नमूद करण्यात आलेल्या आहेत. ( सोबत सदर शासन निर्णयाची प्रत संलग्न करण्यात येत आहे. ) सदर योजनेच्या निकषानुसार पुणे/पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीमधील तसेच महानगरपालिकेपासून ५ कि.मी. च्या आतील महाविदयालयामध्ये शिक्षण घेणारे विदयार्थी सदर योजनेसाठी पात्र होतात. जी महाविदयालये पुणे/पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीमध्ये येतात तसेच महानगरपालिका हददीपासून ५ कि.मी. च्या आतमध्ये येतात, अशा महाविदयालयाच्या प्राचार्यांनी **सदर महाविदयालय हे पुणे/ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीमध्ये/महानगरपालिका हददीपासून ५ कि.मी. च्या परिसरात येत असल्याबाबतचे प्रमाणपत्र** दिनांक २५/५/२०२३ पर्यंत या कार्यालयास सादर करावे, जेणेकरून आपल्या महाविदयालयाची नावे सॉफटवेअर मध्ये समाविष्ठ करता येतील.

(संगिता डावखर)

सहाय्यक आयुक्त

समाज कल्याण, पुणे.